नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०५/१२/२०२५ (शुक्रवार )**

## मा.पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी घेतली माजी सैनिक कुटुंब सुरक्षा समितीची बैठक

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत दर महीन्याच्या ५ तारखेला पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर ग्रामीण जिल्हा येथे मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या अध्यक्षतेखाली तसेच जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, नागपुर यांच्या उपस्थितीत नागपुर ग्रामीण जिल्हयातील माजी सैनिकांच्या बैठकीचे आयोजन करण्यात येते. सदर बैठकीत नागपुर ग्रामीण जिल्हयातील माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबियांना असलेल्या अडचणी, तक्रारी असेल तर त्यांचे निराकरण व समाधान केले जाते.

आज दिनांक ०५/१२/२०२५ रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर ग्रामीण जिल्हा येथे झालेल्या माजी सैनिकांच्या बैठकीमध्ये मा.श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा, यांनी माजी सैनिकांकडुन प्राप्त तक्रारींबाबत तात्काळ कारवाई करत संबधित विभागाला पत्रव्यवहार करण्यात आले. सदर बैठकीत श्री मनोज चव्हाण, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय,नागपुर, सहा.पोलीस निरीक्षक श्रीमती माधुरी गायकवाड, प्रभारी अधिकारी, भरोसा सेल, नागपुर ग्रामीण, पोलीस उपनिरीक्षक ,श्रीमती ज्योत्स्ना गिरी, प्रभारी अधिकारी, मानव संसाधन शाखा, नागपुर ग्रामीण, नागपुर ग्रामीण जिल्हयातील माजी सैनिक आणि इतर पोलीस अंमलदार हजर होते.




## सोशल मिडीयावर धार्मीक भावना दुखावतील अशी पोस्ट करू नका
## नागपुर ग्रामीण पोलीसांचे जनतेला आवाहन

आगामी येणाऱ्या सणोत्सावाच्या पार्शभुमीवर मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात नागपुर ग्रामीण जिल्हयातील सायबर पोलीस स्टेशन तसेच सर्व २१ पोलीस स्टेशन मध्ये सतत सोशल मिडीया मॅनीटरींग सुरू असुन नागपुर ग्रामीण पोलीस सोशल मिडीयावर बारकाईने लक्ष ठेवुन आहे. त्यामुळे कोणीही कोणत्याही धर्माला ,जातीला अनुसरून धार्मीक भावना दुखावतील तसेच जातीय तेढ निर्माण होईल असे फोटो, व्हिडीओ, मजकुर सोशल मिडीयावर पोस्ट करू नये. नागपुर ग्रामीण पोलीसांकडुन तात्काळ कायदेशिर कारवाई केली जाईल.

# नरखेड पोलीस स्टेशन हद्दीतील अभिलेखावरील गुन्हेगार सुरज उर्फ भुरा हरीभाऊ गजभिये याला नागपुर ग्रामीण जिल्हयातुन केले हद्दपार

**महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ अन्वये उपविभागिय दंडाधिकारी, काटोल यांनी सुरज उर्फ भुरा हरीभाऊ गजभिये ,वय २६ वर्षे, रा. खरसोली ,नरखेड ,जि नागपुर याला नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले**

नमुद आरोपीवर दुखापतीचे तसेच अवैध दारू बाबत गुन्हे दाखल असुन त्याचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी पोलीसांनी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. सदर आरोपी असे गुन्हे करण्याच्या सवईचा असल्याने तो अशा प्रकारचे गुन्हे वारंवार करतो. त्यामुळे अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्याच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रशन निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे सदर आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम कलम ५६ (१) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव पोलीसांनी उपविभागिय दंडाधिकारी काटोल यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून **आरोपी नामे सुरज उर्फ भुरा हरीभाऊ गजभिये , वय २६ वर्षे, रा. खरसोली ,नरखेड , जि. नागपुर याला २ महीन्या करीता नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार केले आहे.**

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना अवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला माहीती दयावी .**



**सुरज उर्फ भुरा हरीभाऊ गजभिये**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीस अटक बेला पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बेला** :— दिनांक ०४/१२/२०२५ रोजी बेला पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. अशा मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा सावंगी येथे नाकाबंदी केली असता दोन ट्रॅक्टर व ट्रॉली काही अंतरावर जाताना दिसुन आले. त्यापैकी एक ट्रॅक्टर चालकाने पोलीसांना पाहुन पळ काढला. पोलीसांनी दुसरा ट्रॅक्टर क्र. एम.एच ४० सी.ए ३२६६ व विना नंबरची ट्रॉलीला शिताफिने थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक आरोपी नामे अनुप ज्ञानदेव मेहर, वय ३१ वर्ष, रा. नांदगाव, ता. हिंगणघाट, जि. वर्धा, ह. मु. बेला, ता. उमरेड, जि. नागपूर याला वाहनामधील रेतीबाबत विचारपुस केली असता त्याचेकडील रेती भरून असलेला ट्रॅक्टर ट्रॉलीचा मालक विवेक बबलु उर्फ विलास तायवाडे, रा. बेला, ता. उमरेड, जि. नागपूर याचे सांगणेवरून सावंगी खुर्द गावाजवळील नदीतुन काळी रेती काढुन बेला येथे आणत असल्याचे सांगितले.

घटनास्थळाहुन पोलीसांनी पंचासमक्ष १) ट्रॅक्टर क्र. एम.एच ४० सी.ए ३२६६ किंमती ६०००००/— रूपये आणि २) २ ब्रास रेती किंमती १०,०००/— रूपये आणि असा एकुण ६,१०,०००/रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

नमुद आरोपी वाहन चालक **१.** अनुप ज्ञानदेव मेहर, वय ३१ वर्ष, रा. नांदगाव, ता. हिंगणघाट, जि. वर्धा, ह. मु. बेला, ता. उमरेड, जि. नागपूर व मालक २. विवेक बबलु उर्फ विलास तायवाडे, रा. बेला, ता. उमरेड, जि. नागपूर तसेच पळुन गेलेल्या ट्रॅक्टरचा चालक आरोपी ३. हनुमान उर्फ भुरा क्रिष्णाजी ठाकरे, रा. सालईराणी, ता. उमरेड, जि. नागपूर व मालक नामे ४. सुमीत गजानन दांडवे, रा. बेला, ता. उमरेड, जि. नागपूर **यांच्या विरूध्द पोस्टे बेला येथे कलम ३०३(२), ३(५), ४९ भा.न्या.सं २०२३, सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी चालक अनुप ज्ञानदेव मेहर यास अटक करण्यात आली आहे.**

## एन. सी. सी. कॅम्प हेटी सुरला, ता. सावनेर येथे घेण्यात आला सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम

दिनांक ०५/१२/२०२५ रोजी एन.सी.सी. कॅम्प हेटी, सुरला ता. सावनेर येथील विदयार्थ्यी आणि विदयार्थ्यीनींना सायबर पोलीस स्टेशन नागपुर ग्रामीण चे सहा. पोलीस निरीक्षक प्राची राजुरकर आणि मनापोशि संगिता गांवडे यांनी सायबर सुरक्षे बाबत जनजागृती केली. विदयार्थ्यांना खालील प्रमाणे महत्त्वाच्या मुद्दयांवर सविस्तर माहीती देण्यात आली.

१. **सोशल मिडीया जाहीरातीवर लगेच विश्वास ठेवु नका.**
२. **अनोळखी मो.क्रं वरून आलेल्या बॅक /पोलीस /इतर शासकिय अधिकारी यांचे फोन किंवा मॅसेज बाबत पडताळणी करा.**
३. **मोबाईल मधील ॲप नेहमी प्ले स्टोअर किंवा अधिकृत संकेतस्थळा वरूनच डाउनलोड करावे.**
४. **सोशल मिडीयांवर येणाऱ्या अनोळखी फ्रेंड रिक्वेस्ट पासुन सावधान राहा.**

५. कोणत्याही आमिषाला बळी पडु नका सायबर गुन्हेगाराच्या जाळयात अडकु नका.

६. ऑनलाईन गेम खेळतांना सतर्कता बाळगा.

७. अनोळखी मोबाईल क्रमांकावर आलेले व्हिडीओ कॉल उचलु नका.

८. **Wedding Invitation card .apk, PM kisan .apk, ADHAR CARD Update . apk** या प्रकारचे ईतर **apk** फाईल्स वर क्लिक करू नये तसेच शेयर करू नये आपला मोबाईल हॅक होवु शकतो.

नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की,

सायबर गुन्हयांची तक्रार नोंदविण्यासाठी **www.cybercrime.gov.in** या संकतेस्थळावर किंवा हेल्पलाईन क्रमांक **1930 , 1945** यावर तक्रार नोंदवा.



# पोलीस स्टेशन मौदा येथे घेण्यात आले रक्तदान शिबीर

आज दिनांक ०५/१२/२०२५ रोजी पोलीस ठाणे मौदा येथे एच. डी. एफ. सी. बॅक शाखा मौदा तसेच पोलीस ठाणे मौदा यांनी सयुक्तीकपणे समर्पन ब्लड बॅक भंडारा चे रक्तदान कार्यक्रम आयोजन करण्यात आले. त्यात पोलीस ठाणे मौदा येथिल पोलीस निरीक्षक सारीन दुर्गे, सहायक पोलीस निरीक्षक राहुल किटे, पोलीस उपनिरीक्षक महेश बोथले तसेच पोलीस ठाणे मध्ये कार्यरत असलेले कर्मचारी व होमगार्ड सैनिक यांनी रक्तदान केले.

यावेळी समर्पण ब्लड बॅक भंडारा तर्फे आलेले डॉ. सोहेब आजमी व त्यांचे चमुने सांगितले की, समर्पण ब्लड बॅक तर्फे रक्तदान केलेले रक्त हे सिकलसेल चे पेशेंन्ट तसेच रक्ताची आवश्यकता असलेले रूग्णांना पुरविण्यात येईल.



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने